| | |
|---|---|
| | **क्रिमिनल किरकोळ अर्ज क्र. ८४/२०१९**<br>वसंत आबासो गायकवाड<br>विरुध्द<br>प्रकाश वसंत गायकवाड |

## निशाणी १ व ३१ वरील संयुक्तीक आदेश

प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी सदरचा अर्ज हा या न्यायालयास चालविण्याचा अधिकार नसल्याने अर्ज काढून टाकण्या करिता दाखल केला आहे.

२. अर्जदार याने असे कथन केले आहे की, सदर अर्ज हा अर्जदार यांनी वि.प. यांचेविरुध्द पोटगीसाठी दाखल केला असून त्यास वि.प.यांनी म्हणणे दाखल केले. अर्जदार यांनी ज्या कायद्याखाली अर्ज दाखल केला आहे तो या न्यायालयामध्ये चालण्यास पात्र नाही. सदर अर्ज चालविण्याचा न्यायालयास अधिकार नाही असे वि.प.यांचे कथनआहे. आई वडील व वरिष्ठ नागरीकांचे कल्याण व पालन पोषण अधिनियम २००७ चे कलम ७ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज ट्रॅब्युनल पुढे चालणेस पात्र आहे. त्या कारणाने प्रस्तुतचा अर्ज न्यायालयास चालविणेचा अधिकार नसल्याने सदरचा अर्ज काढून टाकणेत यावा.

३. सदर अर्जास अर्जदार यांनी आपले म्हणणे दाखल केले व असे कथन केले आहे की, वि.प. चा प्रस्तुतचा अर्ज हा कायद्यातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नाही. सबब तो फेटाळण्यात यावा. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा केवळ यातील वि.प. यांना नाहक त्रास देणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचे काम हे यातील अर्जदार यांनी वि.प. यांचेकडून मुलगा या नात्याने पोटगी मिळणेकरीता दाखल केलेले आहे. तसेच प्रस्तुतचा मुळ अर्ज हा यातील अर्जदार यांनी सन २०१९ मध्ये दाखल केलेला आहे. तद्नंतर प्रस्तुतचे काम कोर्टानी निकालावर ठेवलेनंतर यातील वि.प. यांनी या ना त्या कारणाने प्रस्तुतचे काम लांबविणेच्या प्रयत्न केलेला आहे. यातील अर्जदार व वि.प. यांचे नाते हे वडील व मुलगा

असून त्यांचे मधील वाद हा पोटगी संदर्भातील आहे. त्या कारणाने प्रस्तुत कामी न्यायनिर्णय देणेचा या कोर्टास हक्क व अधिकार होता व आहे.

४. प्रस्तुत अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. वि.प. यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांचा युक्तीवाद न केल्याने त्यांच्या विरुध्द त्यांनी त्यांचा युक्तीवाद नाही असा आदेश पारीत करण्यात आला. सदरचा अर्ज हा अर्जदार यांनी वि.प. यांच्या विरुध्द आईवडील व वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालन पोषण अधिनियम २००७ चे कलम ४ व ५ प्रमाणे पोटगी मिळण्याकरिता दाखल केला आहे. सदर अर्जास वि.प. यांनी आपले म्हणणे दाखल केले. त्यानंतर वि.प. यांनी प्रस्तुत अर्ज हा या न्यायालयास चालविण्याचा अधिकार नाही आणि आई वडील व वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालन पोषण अधिनियम २००७ चे कलम ७ प्रमाणे ट्रॅब्युनल पुढे चालण्यास पात्र आहे त्यामुळे अर्ज हा काढून टाकण्यात यावा याकरिता दाखल केला. सदर अर्जास अर्जदार यांनी म्हणणे दाखल केले व असे कथन केले आहे की वि.प. चा प्रस्तुतचा अर्ज हा कायद्यातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नाही. सबब तो फेटाळण्यात यावा. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा केवळ यातील वि.प. यांना नाहक त्रास देणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचे काम हे यातील अर्जदार यांनी वि.प. यांचेकडून मुलगा या नात्याने पोटगी मिळणेकरीता दाखल केलेले आहे. तसेच प्रस्तुतचा मुळ अर्ज हा यातील अर्जदार यांनी सन २०१९ मध्ये दाखल केलेला आहे. तद्नंतर प्रस्तुतचे काम कोर्टानी निकालावर ठेवलेनंतर यातील वि.प. यांनी या ना त्या कारणाने प्रस्तुतचे काम लांबविणेच्या प्रयत्न केलेला आहे. यातील अर्जदार व वि.प. यांचे नाते हे वडील व मुलगा असून त्यांचे मधील वाद हा पोटगी संदर्भातील आहे. त्या कारणाने प्रस्तुत कामी न्यायनिर्णय देणेचा या कोर्टास हक्क व अधिकार होता व आहे.

५. प्रस्तुत अर्ज हा वि.प. यांनी या न्यायालयास सदर अर्ज चालविण्याचा अधिकार असून तो आई वडील वरिष्ठ नागरिकांचे कल्याण याबाबत पोषण अधिनियम २००७ च्या कलम ७ प्रमाणे ट्रॅब्युनल पुढे चालण्यास पात्र आहे त्यामुळे अर्ज काढून टाकण्यात यावा याकरिता दाखल केला . त्यामुळे सदर कायद्याच्या कलम ७ च्या तरतुदींचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर तरतुदीनुसार सदर अर्ज हा ट्रॅब्युनल पुढे चालण्यास

पात्र आहे असे स्पष्ट नमुद केले आहे त्यामुळे वरील बाबींचा व सदर तरतुदीनुसार सदर अर्ज हा मंजूर होण्यास पात्र आहे त्यामुळे सदर अर्ज हा काढून टाकण्यात येतो. सबब त्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज हा मंजूर करण्यात येतो.

२. फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ८४/२०१९ हा काढून टाकण्यात येतो.

दिनांक ०२.०४.२०२६

एस.व्ही.जंगमस्वामी,
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पन्हाळा.
जिल्हा कोल्हापूर